**सांगोला येथील दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, सांगोला**

**नियमित दिवाणी मुकदमा नं. १६१/२०१४ निशाणी ४९ लगत आदेश**

(साऊबाई विरुध्द नवनाथ )

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी त्यांचे विरुध्द झालेला 'उलटतपास नाही'' आदेश रद्द होऊन उलट तपास घेणेची परवानगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादीच्या कथनाप्रमाणे, सदर कामामध्ये नि. २५ वरती प्रतिवादी विरुध्द उलटतपास नाही असा आदेश पारीत झाला आहे. दावा हा स्थावर मिळकतीसंबंधी असल्याने साक्षीदाराचा उलटतपास घेणे आवश्यक आहे, अन्यथा प्रतिवादींचे नुकसान होणार आहे. तरी प्रतिवादी यांचे विरुध्द पारीत झालेला उलटतपास नाहीचा आदेश रद्द करणेत येवून त्यांना उलटतपास घेण्याची परवानगी मिळावी अशी विनंती प्रतिवादी यांनी विनंती केली.

३. प्रस्तुत अर्जावर वादीने म्हणणे दिले की, प्रतिवादीचा अर्ज खोटा आहे. अर्जामध्ये कारण नमुद केले नाही. यापुर्वीही असा आदेश झालेल आहे. सबब, अर्ज नामंजूर व्हावा अशी विनंती केली आहे.

४. वादी व प्रतिवादीतर्फे युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रांचे

अवलोकन केले असता असे दिसून येते की, दाव्यामध्ये प्रतिवादी यांनी कैफियत दिलेली आहे. दावा चौकशीस असून वादीने पुराव्याचे शपथपत्र दिले आहे. प्रतिवादी वेळेमध्ये साक्षीदार यांचा उलटतपास घेवून न शकल्यामुळे त्यांचे विरुध्द उलटतपास नाही आदेश पारीत करण्यात आला आहे.

५. सदर अर्जाच्या पुष्टयर्थ प्रतिवादी यांनी निशाणी ५० कडे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. दाव्यातील मागणी पाहता वादाचा विषय गुणदोषांवर निर्गत होणे आवश्यक आहे. अर्ज मंजुर केल्याने वादींचे नुकसान होणार नाही. दावा गुणदोषावर अंतिमतः निकाली होण्यास मदत होणार आहे. जर प्रतिवादी यांना वादी यांचा उलटतपास घेण्याची संधी दिली नाही तर ते त्यांच्या न्यायहक्कापासून वंचित राहू शकतात. दाव्याचा विषय लक्षात घेता दाव्याचा अंतिम निर्णय गुणदोषांवर पुराव्याअंती होणे आवश्यक असल्याने प्रतिवादींना उलट तपास घेण्याची संधी देणे आवश्यक वाटते. ही बाब निश्चितपणे जाणवते की, प्रतिवादीच्या कृत्यामुळे वादीस विनाकारण विलंब आणि मानसिक त्रास सहन करावा लागला, परंतू सदरची बाब ही प्रतिवादीवर आर्थिक भूर्दंड लादल्यानंतर काहीअंशी कमी करता येवू शकते. याउलट, अर्ज नामंजूर केल्याने प्रक्रियात्मक विलंब वाढून आणखी जटील बनू शकते. वरील सर्व कारणांचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो

## **आ दे श**

१. अर्ज (नि.क्र. ४९) प्रतिवादी यांनी रु. २००/- एवढा खर्च देण्याच्या अटीवर

मंजूर करणेत येतो.

२. वरील खर्चाची रककम प्रतिवादीने वादी यांना अदा करावी. सदर आदेशाची पुर्तता केलेवर प्रतिवादी यांचे विरुध्द झालेला 'उलटतपास नाही' चा आदेश रद्द करुन त्यांना उलटतपास घेण्याची परवानगी देणेत येते.

SANJAY MOTIRAM GHUGE
Digitally signed by SANJAY MOTIRAM GHUGE
Date: 2024.08.12 11:26:42 +0530

सांगोला. (श्री संजय मो. घुगे)

दिनांक – ०९/०८/२०२४. दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, सांगोला.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment/order :-

| | | | |
|---|---|---|---|
| **(a)** | Name of the Stenographer | **:-** | A. A. Chavan. |
| **(b)** | Court | **:-** | Civil Judge Junior Division and Judicial Magistrate First Class, Sangola. |
| **(c)** | Judgment/Order signed by PO on | **:-** | 09/08/2024. |
| **(d)** | Judgment/Order uploaded on | **:-** | 12/08/2024. |